<u>वार्तापत्र</u>

पोलीस अधीक्षक कार्यालय, गडचिरोली
दिनांक-२८/०७/२०१८

## नक्षल सप्ताहास झुगारुन फुलली कोरची येथील बाजारपेठ

➡ स्थानिक जनता व पोलीस दलाचा पुढाकार

गडचिरोली जिल्हयातील छत्तीसगड सीमेलगत असलेल्या, कोरची तालुक्याची जिल्हयाच्या नकाशात नक्षलग्रस्त तालुका म्हणुन ओळख असुन जांभुळ व लाल मिरची यासाठी प्रसिध्द आहे. नक्षल सप्ताह दरम्यान गेली काही वर्ष या ठिकाणची बाजारपेठ बंद असायची, यावर्षी मात्र स्थानिक जनता व पोलीस दलाच्या पुढाकारामुळे नक्षल सप्ताहाला झुगारुन बाजारपेठ नेहमीप्रमाणे फुलली असल्याचे दिसुन येत आहे.

या भागातील बहुतांश गावे ही छत्तीसगढ सीमेलगत असुन गावात अनेकदा नक्षल्यांचाच वावर असायचा, त्यामुळे साहजिकच नक्षल्यांच्या सप्ताह दरम्यानच्या दहशतीचा परिणाम कोरची येथील बाजारपेठेवर होत असायचा. टीपागड पहाडीच्या डोंगररांगामुळे नक्षलवादयांचा शोध घेणे कठीण समजले जात असले तरीही, या भागात गडचिरोली पोलीस दलाने ऐतिहासिक चकमकी घडवुन नक्षलवादयांना सळो

की पळो करुन सोडलेले आहे. तसेच पोलीस दलाचे विविध उपक्रम या भागात नेहमीच राबविले जातात. त्यामुळे जनतेला विकासाचे महत्व समजु लागले आहे.

अंदाजे १० ते १२ वर्षापुर्वी नक्षलवादयांनी मेडीकल स्टोअर्स असलेल्या एका औषध विक्रेत्या व्यापाऱ्याची, भरदिवसा दुपारचेवेळी सिनेस्टाईल पध्दतीने हत्या केली होती. त्या दहशतीमुळे नक्षल सप्ताह येताच कोरचीचे व्यापारी सतर्क राहुन दुकाने बंद ठेवायचे. त्यामुळे कोरची बाजार नक्षल सप्ताह दरम्यान ओस पडलेले दिसत असे. मात्र याच काळात सामान्य जनतेचे शेतीचे कामे सुरु असतात. त्यामुळे या दिवसात ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना कोरची शिवाय कोणतीही मोठी बाजारपेठ नसल्याने, सामान्य जनतेला अडथळा निर्माण होत असे.

नक्षली हे आदिवासीसाठी नव्हे तर स्वत:च्या स्वार्थासाठी आदिवासी जनतेचा बळी घेत आहेत. व आदिवासी जनतेची दिशाभुल करुन त्या विकासापासुन वंचित करण्याचा सतत प्रयत्न करीत आहेत .ही बाब आता जनतेलाही समजु लागली आहे. त्यामुळे कोरची पोस्टे चे प्रभारी अधिकारी पोउपनि गोरखनाथ दहीफळे सा. व त्यांच्या सहकार्यांच्या प्रयत्नांमुळे यावर्षी कोरची येथील बाजारपेठ सुरु ठेवण्यात आली आहे. जिल्हयातील विविध भागात आदिवासी जनता नक्षलवादाचा विरोध करीत असल्याचे दिसुन येते. याचाच एक भाग म्हणुन कोरची तालुकयातील जनता सुध्दा नक्षलवादाविरुध्द एकवटल्याचे दिसुन येत आहे.


श्रीराम जय राम


Frontline
YEH AARAM KA MAMLA HAI!
DILIP CLOTH STORE,